उपजिल्हाधिकारी संवर्गातील ७ परिविक्षाधीन उमेदवारांकरीता अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:- संकीर्ण-२०२६/प्र.क्र.११०/E-१७८७८४२/आस्था-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - .०३२ ४००
दिनांक : २१/०८/.२०२६

संदर्भ:-

१. वित्त विभाग, शासन निर्णय, पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१,दि. २०/०२/२०१६.
२. सामान्य प्रशासन विभाग, आदेश, क्रमांक टिआरएन-११२४/प्र.क्र.४३/प्रशि-२, दि.२८/०७/२०२६.
३. महसूल व वन विभाग, कार्यासन ई-२ ची टिप्पणी.

प्रस्तावना :-

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परीक्षेद्वारे सरळ सेवेने नियुक्त होणाऱ्या गट-अ संवर्गातील उमेदवारांसाठी यशदा, पुणे या संस्थेमार्फत एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण देण्यात येते. राज्यसेवा (मुख्य) परीक्षा-२०२४ च्या अंतिम निकालाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस प्राप्त ठरलेल्या गट-अ संवर्गातील ७ परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी यांना परिविक्षाधीन अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे.

परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी ७ परिविक्षाधीन उमेदवारांचे प्रशिक्षण दिनांक १०/०८/२०२६ पासून यशदा, पुणे येथे सुरु झाले असून त्या अनुषंगाने उक्तप्रमाणे उपजिल्हाधिकारी ७ परिविक्षाधीन उमेदवारांचे वेतन अदा करण्यासाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-:

राज्यसेवा (मुख्य) परीक्षा-२०२४ च्या अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या व सामान्य प्रशासन विभागाने प्रशिक्षणांतर्गत कार्यक्रमासाठी नियुक्त केलेल्या "गट-अ" या संवर्गातील ७ परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी अधिसंख्य पदे दि.१०/०८/२०२६ ते दि.०९/०८/२०२८ या दोन वर्षाच्या कालावधीकरीता निर्माण करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. सदरहू कालावधीतील अधिसंख्य पदाच्या वेतनावरील होणारा खर्च परिविक्षाधीन उमेदवार जिल्हानिहाय प्रशिक्षणासाठी वर्ग केलेल्या जिल्ह्याकरिता "मागणी क्र. सी-१, २०५३- जिल्हा प्रशासन (००)(०९३) जिल्हा आस्थापना (०१) सर्व साधारण आस्थापना (०१)(०१) आयुक्त कोकण (२०५३ ००२८)/आयुक्त नाशिक (२०५३ ००४६)/आयुक्त पुणे (२०५३ ००६४) / आयुक्त अमरावती (२०५३ ००८२)/

आयुक्त नागपूर (२०५३०१०८) /आयुक्त छत्रपती संभाजीनगर (२०५३ ०१२६) या लेखाशिर्षाखालील त्या-त्या वर्षीच्या मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातुन भागविण्यात यावा.

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २०/०२/२०१६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०८२११७३१२४६२४८ असा आहे. उक्त शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SOMANAND MARUTI DHAMDHERE

Digitally signed by SOMANAND MARUTI DHAMDHERE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Dept, 2.5.4.20=E8D3E0FE1FD411C67E7FB3577489DEC59D4B9150AA956D2BA2FC4AABD663CB19, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AE6C8561AE02ED98AB4F169C05FEB996D590865A364930E261CB491F8F5430BB, cn=SOMANAND MARUTI DHAMDHERE
Date: 2026.08.21 18:15:55 +05'30'

(सोमानंद ढमढेरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. जिल्हाधिकारी (सर्व)
३. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६. जिल्हा कोषागार अधिकारी,(सर्व)
७. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई/नागपूर.
८. वित्त विभाग (वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई - ३२.
९. सह सचिव/उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-प्रशि-२), मंत्रालय, मुंबई - ३२.
१०. सह सचिव/उप सचिव (कार्यासन अर्थसंकल्प-/आस्था-२)महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.
११. निवड नस्ती, कार्यासन आस्था-८, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.